2008

बैठक क्र.

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

# 0101

# VSA (मराठी माध्यम)

प्रश्नपत्रिका क्र. I — भाषा (मराठी) व सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल) — वेळ : 11 A.M. ते 12 Noon

पृष्ठ : 12 — एकूण गुण : 100

**सूचना :—**

(1) या प्रश्नपत्रिकेमध्ये प्रत्येकी **दोन** गुणांचे **50** प्रश्न आहेत.

(2) **सर्व** प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(3) उत्तरे लिहिण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी चार पर्याय दिलेले आहेत. पर्याय क्र. 1, 2, 3, 4 असे इंग्रजीत आहेत. त्यापैकी एकच पर्यायी उत्तर योग्य आहे. उत्तराचा योग्य पर्याय उत्तरपत्रिकेत चौकटीमध्ये इंग्रजी अंकातच लिहावा. जसे [4].

(4) उत्तराचा पर्याय इंग्रजी अंकातच नोंदवावा अन्य भाषेमध्ये नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरली जाणार नाहीत.

(5) शक्यतो खाडाखोड करू नये व पर्यायी उत्तरांवर गिरवू नये. अशी दुरुस्त केलेली पर्यायी उत्तरे ग्राह्य धरली जात नाहीत.

(6) काळ्या किंवा निळ्या शाईच्या पेनाने अगर बॉलपेनने उत्तरे नमूद करावीत. शिसपेन्सिलने अथवा लाल किंवा इतर शाईने लिहिलेली उत्तरे तपासली जात नाहीत.

(7) उत्तराची दुरुस्ती करावयाची झाल्यास उत्तराच्या चौकोनातील उत्तर क्रमांकावर [3] अशा प्रकारे तीन आडव्या रेषा मारून बदललेल्या उत्तराचा पर्याय क्रमांक चौकोनापुढे उजव्या बाजूसच लिहावा. जसे [3] 2.

(8) उत्तराची केलेली दुरुस्ती प्रत्येक प्रश्नासाठी **एकदाच** मान्य होईल.

(9) एका विषयासाठी दुरुस्त केलेल्या जास्तीत जास्त **पाच** उत्तरांची दुरुस्ती ग्राह्य धरण्यात येईल **पाच** पेक्षा जास्त उत्तरे नोंदविल्यास अशा जादा दुरुस्त्या ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

(10) प्रश्नपत्रिकेतील भाग **I** मध्ये **35** प्रश्न भाषेचे आहेत आणि भाग **II** मध्ये **15** प्रश्न सामाजिकशास्त्राचे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल) आहेत.

## भाग I

### भाषा (मराठी)

**प्र. 1 ते 3 : खालील उतारा काळजीपूर्वक वाचा. त्या खालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय क्रमांक लिहा.**

उन्हाळा तसाच चालू होता ते काळे भुरके ढग संथपणे तरंगत तसेच माथ्यावर येत होते आणि निघून जात होते; आणि मग एक दिवस मध्यरात्री पाण्यात डुंबून गारव्याने निथळत वाऱ्याच्या झुळकांमागून झुळका आल्या. पडद्यांना ढुशा मारून घरात शिरल्या, कागद फडकावीत व कपड्यांशी दंगामस्ती करीत त्यांनी घरभर पिंगा घातला आणि दारे खडखडावीत बाहेर पडून त्या माळावर हुंदडायला गेल्या.

पश्चिमेकडून भराभर मेघ आले आणि चांदण्याने उजळलेले आकाश त्यांनी व्यापून टाकले. आकाशात चढलेली तिरपी चंद्रकोर बावरली चांदणे मावळले. काळोखाच्या पोटात पावसाच्या सरी सडसडत धावल्या. हवेत सुखदायक गारठा आला. बिछान्यात पडल्या पडल्या अंधारातच माणसे एकमेकांना म्हणाली, ''पाऊस आला वाटतं !''

1. पडद्यांना ढुशा मारून घरात कोण शिरले ?

(1) ऊन (2) मेघ

(3) चांदणे (4) वारा

2. चंद्रकोर का बावरली ?

(1) सूर्य आल्यामुळे (2) वारा आल्यामुळे

(3) ढग आल्यामुळे (4) पाऊस आल्यामुळे

3. आकाश कोणी व्यापून टाकले ?

(1) सूर्यप्रकाशाने (2) मेघांनी

(3) विजेने (4) चंद्रप्रकाशाने

**प्र. 4 ते 6 : पुढील कविता वाचून विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.**

होळी रे होळी, पुरणाची पोळी
खाऊन रंगाची करूया खेळी
    रंग उडवूया लाल नि पिवळे
    त्यांच्या जोडीला निळे जांभळे
    दणाणून सोडूया, आपली आळी....
शिशिर ऋतुतील सण हा मोठा
सूर्य उगारी अपुला सोटा
दाद नाही देत त्याला
उन्हात खेळतो सगळी
    हुताशनीची करूया पूजा
    दिवसभराची मजाच मजा
    घरात भरपेट खाऊया
        पुरणाची पोळी.

4. होळीचा सण कोणत्या ऋतूत येतो ?

(1) ग्रीष्म    (2) शरद

(3) शिशिर    (4) वसंत

5. या सणातील विशेष पक्वान्न कोणते ?

(1) गुळाची पोळी    (2) पुरणपोळी

(3) नारळीभात    (4) मोदक

6. या कवितेत खालीलपैकी कोणत्या रंगाचा उल्लेख आला **नाही** ?

(1) लाल (2) पिवळा

(3) निळा (4) नारिंगी

7. पुढीलपैकी कोणते विशेषण 'कागद' या नामासाठी उपयोगी पडत **नाही** ?

(1) रंगीत (2) चौकोनी

(3) शहाणा (4) गुळगुळीत

8. 'काल मी, माझा मित्र, माझी बहीण व आई असे आम्ही सर्वजण नाटकाला गेलो होतो,' या वाक्यात किती सर्वनामे आली आहेत ?

(1) पाच (2) सहा

(3) चार (4) तीन

9. खालीलपैकी भविष्यकाळी वाक्य कोणते ?

(1) दिलीप कथा वाचतो. (2) दिलीपने कथा वाचली.

(3) दिलीप कथा वाचेल. (4) दिलीप कथा वाचत आहे.

10. दिलेल्या शब्दांतून एकवचनी शब्द ओळखा.

(1) पाने (2) गाणे

(3) वने (4) दागिने

11. खालील वाक्यातील उद्देश्य ओळखून योग्य उत्तराचा पर्याय क्रमांक लिहा.

संत गाडगेबाबांनी स्वच्छतेचा मूलमंत्र दिला.

(1) स्वच्छतेचा (2) मूलमंत्र

(3) संत गाडगेबाबांनी (4) दिला

12. खालीलपैकी शुद्ध शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) ऊत्सव (2) ऊस्तव

(3) उत्सव (4) उस्तव

13. खालील वाक्यांपैकी शुद्ध वाक्याचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) मुले खेळत होती अंगणात. (2) अंगणात खेळत होती मुले.

(3) मुले अंगणात खेळत होती. (4) मुले अंगणात होती खेळत.

14. खालील वाक्प्रचाराचा अर्थ ओळखून त्याचा पर्याय क्रमांक लिहा.

तोंडचे पाणी पळणे—

(1) अतिशय घाबरणे (2) खूप तहान लागणे

(3) हार मानणे (4) पळून जाणे

15. खाली दिलेल्या चौकोनात एक म्हण लपली आहे. ती शोधा व तिचे पाचवे व सातवे अक्षर क्रमाने लिहा.

| | | |
|---|---|---|
| ता | ना | ई |
| अं | ण | डे |
| वा | ना | च |
| क | ये | ग |

(1) वा, ई (2) ई, अं

(3) ये, क (4) ता, च

**16 ते 18 : खालील संवाद काळजीपूर्वक वाचा. त्या खालील प्रश्नांच्या योग्य पर्यायाचा क्रमांक उत्तराच्या चौकटीत लिहा :**

"हं, नाव काय ?"

"वर्षा"

"वडिलांचे नाव ?"

"श्रावण"

"आडनाव ?"

"हिरवे"

"वर्षा श्रावण हिरवे" असे संपूर्ण नाव सांगता येत नाही का ?"

"साहेब, तुम्ही तरी संपूर्ण नाव काय असे विचारले का ?"

पूरग्रस्तांच्या छावणीत एकच खसखस पिकली.

16. या संवादावेळी किती व्यक्ति उपस्थित आहेत ?

(1) दोन (2) तीन

(3) चार (4) निश्चित सांगता येत नाही

17. हा संवाद कोठे घडला आहे ?

(1) भूकंपग्रस्तांच्या छावणीत (2) दुष्काळग्रस्तांच्या छावणीत

(3) पूरग्रस्तांच्या छावणीत (4) धरणग्रस्तांच्या छावणीत

18. हा संवाद कोणत्या ऋतुतील असावा ?

(1) वर्षा (2) वसंत

(3) हेमंत (4) शिशिर

19. खालीलपैकी योग्य मायना कोणता ते ओळखून उत्तराचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) तीर्थस्वरूप मामा (2) तीर्थरूप मामा

(3) माननीय मामा (4) श्रीमान मामा

**20 ते 22 : रिकाम्या जागी योग्य शब्द भरून सुसंगत वाक्यांचा परिच्छेद तयार करा.**

20. तो..............चा दिवस होता.

(1) बाजारा (2) बेंदरा

(3) दिवाळी (4) गणेश चतुर्थी

21. अनेक विक्रेते..........विकत होते.

(1) कासरे व दोर (2) मिठाई व फटाके

(3) भाजी (4) गणेशमूर्ती

22. उन्हाळ्यामुळे भाज्यांचे भाव...............होते.

(1) उतरले (2) कडाडले

(3) स्थिर (4) स्वस्त

23. 'राजा' या शब्दाला समानार्थी शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) रंक (2) शूर

(3) नृप (4) प्रजा

24. 'मंदी' या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्दाचा पर्याय क्रमांक लिहा.

(1) तेजी (2) तोटा

(3) फायदा (4) मंद

25. रिकाम्या चौकटीत कोणती दोन अक्षरे भरली म्हणजे "सुगंध" या अर्थाचा शब्द तयार होईल ?

| | | | |
|---|---|---|---|
| | रि | | ळ |

(1) सु, म (2) गं, ध

(3) प, म (4) वा, स

26. खालीलपैकी कोणता जोडशब्द **नाही** ?

(1) तिखटमीठ (2) जाळपोळ

(3) कामधंदा (4) लंबोदर

27. 'उभयचर' या शब्दासाठी योग्य शब्दसमूह निवडा.

(1) जमिनीवर राहणारे प्राणी

(2) पायी चालणारे प्राणी

(3) पाण्यात व जमिनीवर राहणारे प्राणी

(4) पाण्यात राहणारे प्राणी

28. खाली दिलेल्या शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.

ज्याचे वर्णन करता येत नाही असे—

(1) अवर्णनीय (2) वर्णनीय

(3) विलोभनीय (4) असामान्य

29. चुकीची जोडी शोधा.

(1) घुबड—घूत्कार (2) मोर—रेकणे

(3) घोडा—खिंकाळणे (4) हंस—कलरव

30. खालील अक्षरे जुळवून अर्थपूर्ण शब्द तयार करा. त्यातील मधले अक्षर ओळखा.

'रा र कु ज मा'

(1) मा (2) र

(3) ज (4) कु

31. 'विजयनगर' या शब्दातील अक्षरांपासून 'ज' या अक्षराने सुरू होणारे दोन अक्षरी किती अर्थपूर्ण शब्द तयार होतील ?

(1) तीन
(2) चार
(3) पाच
(4) सहा

32. खाली पशुपक्षी व त्यांची घरे अशा जोड्या दिल्या आहेत. त्यांपैकी अयोग्य जोडी कोणती ?

(1) मधमाशा—पोळे
(2) कोळी—जाळे
(3) वाघ—जाळी
(4) कोंबडी—घरटे

33. खालील शब्द वर्णानुक्रमे लावल्यास तिसरा शब्द कोणता येईल ?

(कसरत, कनवाळू, कमंडलू, करवत)

(1) करवत
(2) कसरत
(3) कनवाळू
(4) कमंडलू

34. 'हिरकणीला गडावर कोणी <u>वाली</u> भेटला नाही' या वाक्यातील 'वाली' म्हणजे.....

(1) एक वानर
(2) सरदार
(3) सैनिक
(4) रक्षणकर्ता

35. 'कुसुमाग्रज' यांचे पूर्ण नाव काय ?

(1) कृष्णाजी केशव दामले
(2) विष्णू वामन शिरवाडकर
(3) प्रल्हाद केशव अत्रे
(4) राम गणेश गडकरी

ग्रा.

## भाग II

### सामाजिकशास्त्रे (इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल)

36. खालील पर्यायांपैकी, कोणती गोष्ट शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात केली **नाही** ?

(1) भांडखोर वतनदारांना त्यांनी आपल्या काबूत आणले

(2) सर्व धर्मातील साधुसंतांचा त्यांनी सन्मान केला

(3) न्यायाचे हिंदवी स्वराज्य त्यांनी स्थापन केले

(4) प्रजेवर जुलूम करत त्यांनी स्वराज्य स्थापन केले

37. शिवरायांची राजमुद्रा........भाषेत होती.

(1) मराठी (2) फार्सी

(3) संस्कृत (4) हिंदी

38. "महाराज गडावर पोहोचले. मी माझी चाकरी बजावली. आता मी सुखाने मरतो," असे कोण म्हणाले ?

(1) बाजीप्रभू (2) मुरारबाजी

(3) तानाजी मालुसरे (4) फिरंगोजी नरसाळा

39. आग्र्याहून पेटाऱ्यातून निसटताना शिवरायांनी............ला आपल्या जागी झोपवले ?

(1) मदारी (2) हिरोजी

(3) संभाजी (4) रामसिंग

40. ............यांनी शिवरायांच्या राज्याभिषेकाचे पौरोहित्य केले.

(1) आर्यभट्ट (2) गंगाभट्ट

(3) गागाभट्ट (4) मोरेश्वर पंडित

41. शिवरायांनी आरमारदल उभारले कारण–

(1) आपले आरमारदल असावे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती

(2) सिद्‌दी, पोर्तुगीज, इंग्रज यांच्यापासून स्वराज्याला धोका निर्माण होण्याचा संभव होता

(3) सिंधुदुर्ग, विजयदुर्ग यासारखे भक्कम सागरकिल्ले होते

(4) गनिमी काव्याने शत्रूशी लढता यावे.

42. लोकांनीच आपला राज्यकारभार करणे याला............असे म्हणतात.

(1) राजेशाही (2) संविधानसभा

(3) लोकशाही (4) लोकसभा

43. खालीलपैकी कोणते आपले कर्तव्य **नाही** ?

(1) सर्वांशी प्रेमाने आणि बंधुभावाने वागणे

(2) ऐतिहासिक स्मारके व वास्तू यांचे जतन करणे

(3) स्वत:हून कायदे पाळणे

(4) सरकारी कर बुडवणे

44. खालीलपैकी कोणते आपले राष्ट्रीय प्रतीक **नाही** ?

(1) राष्ट्रभाषा (2) राष्ट्रध्वज

(3) राष्ट्रगीत (4) राजमुद्रा

45. ..............पर्वतातील कळसूबाई हे सर्वात उंच शिखर आहे.

(1) सातपुडा (2) सह्याद्री

(3) हिमालय (4) अजिंठा

46. सिमेंट तयार करताना..............वापरतात.

(1) बॉक्साईट (2) सिलिका

(3) खडक (4) चुनखडक

47. महाराष्ट्रात...........चे पीक जास्त काढले जाते.

(1) ज्वारी (2) गहू

(3) बाजरी (4) तांदूळ

48. औष्णिक वीजकेंद्र व जिल्हा यांच्या जोड्या दिल्या आहेत, त्यापैकी योग्य जोडी ओळखा.

(1) पारस—चंद्रपूर

(2) खापरखेडा—नागपूर

(3) दुर्गापूर—अकोला

(4) चोला—नाशिक

49. दिलेल्या चित्रातील वाद्य ओळखा :



(1) ढोलकी

(2) नगारा

(3) ढोल

(4) संबळ

50. सूर्य हा एक..................आहे.

(1) ग्रह

(2) उपग्रह

(3) तारा

(4) माला